ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# "महाराष्ट्रातील रामोशी–बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास"

**प्रा. डॉ. सुषमा अ. जाधव**
समाजशास्त्र विभागप्रमुख, देवचंद कॉलेज ,अर्जुननगर
ता.कागल, जि.कोल्हापूर

★★★

**गोषवारा** – महाराष्ट्र शासन 26 सप्टेंबर 2008 नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार समाविष्ट करण्यात आलेल्या भटक्या विमुक्त जमाती मध्ये बेरड, बेस्तर ,भामटा,कैकाडी, कंजारभाट ,बंजारा, पारधी, राज पारधी, राजपूत बामटा, रामोशी–बेरड, वडार, वाघरी आणि छप्परबंद अशा चौदा जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे. मुक्त जमातीत झालेली दुरावस्था बघून त्यांच्यात सुधारणा होण्याकरता या जमातीतील काही सुशिक्षित आणि काही भटके तर सुधारणावादी लोकांनी चळवळी सुरू केल्या त्यात एक करता संशोधकाने स्नोबॉल नमुना निवड पद्धतीचा वापर करून मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन ना वापर करण्यात आला आहे

रामोशी–बेरड जमातीच्या अनेक चळवळी, अधिवेशन ,मोर्चे ,निवेदने, पत्रके, या अनेक मार्गाने शासनापर्यंत त्यांच्या समस्या पोहोचण्याचा प्रयत्न केला.परंतु या जमातीचा मूळ प्रश्न सुटला नाही. आजही या जमातीं नागरिक हक्कापासून वंचित असलेल्या दिसून येतात.

महत्वपूर्ण शब्द भटक्या विमुक्त, तीन तारेचे कुंपण, गुन्हेगारी जमाती कायदा इत्यादी प्रस्तावना – कोणत्याही समाजाचा विकास हा केवळ विशिष्ट समाजाच्या विकासावर अवलंबून नसून तो सर्व समुदायाच्या सर्वांगीण प्रगती वर समाजाच्या विकासाचे मोजमाप केले जाते. परंतु भारत स्वातंर्त्र्याच्या 68 वर्षानंतरही भारतात असे काही समुदाय आहेत कि ते आजही स्थिर नाही त्यांच्याकडे उदरनिर्वाहाची साधने नाही, ज्यांना स्वताची ओळख ,गाव ,शिवार नाही असा हा मागासलेला व प्रचंड दारिद्र्, उपेक्षित व दुर्लक्षित अस्थिर समुदाय म्हणजे भटक्या विमुक्त जमाती होय. ब्रिटिशांच्या ध ोरणामुळे जंगल संपत्ती व इतर उपजीविकेच्या साधनांवर हक्क गेलेल्या जमाती तसेच ब्रिटिशांच्या धोरणांना कडाडून विरोध केला , ज्या जमातीने बंड केल्या अशा जमातींना इंग्रजांनी "1871 च्या गुन्हेगार जमाती कायदा" ने गुन्हेगार ठरवले ,व हा कायदा जवळजवळ 80 वर्षांनी म्हणजे 31 ऑगस्ट 1952 ला रद्द करण्यात आला. परंतु या कायद्याची अंमलबजावणी ही 11 एप्रिल 1960 रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहर नेहरू यांच्या हस्ते सोलापूर येथील सेटलमेंट च्या तारा तोडून या वसाहतींमधील भटक्या विमुक्त जमातींना मुक्त करण्यात आले. त्यावेळी " पंडित नेहरू संसदेतील आपल्या भाशणात म्हणाले होते की, आम्ही सर्वजण भारताला स्वातंर्त्र्य मिळाल्यानंतर मुक्त आहोत. पण या गुन्हेगारी जमातीचे सारे लोक स्वातंर्त्र्याचा लढा लढणारे असल्याने ते आजपासून विशेष मुक्त आहेत".तेव्हापासून या जमातींना विमुक्त म्हणजेच विशेष मुक्त असे नाव देण्यात आले. सेटलमेंट(तीन तारेचे कुंपण– वसाहत) मधून बाहेर पडलेल्या आणि विस्थापित झालेल्या या भटक्या विमुक्त जमातींच्या पुनर्वसनाचे करिता प्रस्थापित शासनाने कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यांच्या निवास, शिक्षण ,आरोग्य, उपजीविका या विषयी सरकारने कोणतेही धोरण ठरवले नाही. म्हणून भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांनी आपल्या हक्कासाठी,अस्तित्वासाठी च्या अनेक चळवळी, मोर्चे, आंदोलने निवेदने करण्यात आले आणि या मार्फत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

महाराष्ट्र शासन 26 सप्टेंबर 2008 नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार समाविष्ट करण्यात आलेल्या भटक्या विमुक्त जमाती मध्ये बेरड, बेस्तर ,भामटा,कैकाडी, कंजारभाट ,बंजारा, पारधी, राज पारधी, राजपूत बामटा, रामोशी–बेरड, वडार, वाघरी आणि छप्परबंद अशा चौदा जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे. मुक्त जमातीत झालेली दुरावस्था बघून त्यांच्यात सुधारणा होण्याकरता या जमातीतील काही सुशिक्षित आणि काही भटके तर सुधारणावादी लोकांनी चळवळी सुरू केल्या त्यात एक त्यामध्ये भीमराव जाधव गुरुजी ,बोधन नगरकर, अथर दौलतराव भोसले, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, मोतीराज राठोड, भीमराव गस्ती लक्ष्मण गायकवाड, सनातन भोसले, सुधीर अनवले इत्यादी.

शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे** :– 1. रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळीची उद्दिष्टे जाणून घेणे.

2. रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळीचा अध्ययन करणे.

**समस्या सूत्रण** :– संशोधकाने सदर शोधनिबंधात मध्ये "महाराष्ट्रातील रामोशी बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास "या विशयावर शोधनिबंध सादर केला आहे.

**अभ्यास पद्धती :– 1. अभ्यास क्षेत्र** –कोल्हापूर, सांगली ,कराड,

सातारा ,सोलापूर

**2. संशोधन आराखडा** – प्रस्तुत शोधनिबंधात करिता संशोधकाने अन्वेशण आत्मक परिचयात्मक संशोधन आराखडा चा उपयोग केला आहे.

**3. नमुना निवड तंत्रे** – सदर शोधनिबंधात करिता संशोधकाने स्नोबॉल नमुना निवड पद्धतीच्या माध्यमातून भटक्या–विमुक्तांच्या चळवळीमध्ये कार्यरत असणाऱ्या नेतृत्वाची निवड करून रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळी संदर्भातील माहिती मिळवलेली आहे.

**4. तथ्य संकलन** – सदरील शोधनिबंधा करिता संशोधकाने प्राथमिक आणि दुय्यम माहिती स्त्रोत चा वापर केला आहे.प्राथमिक तथ्य संकलन मध्ये मुलाखत अनुसूची आणि टेप रेकॉर्डिंग या स्त्रोत वापर करण्यात आला आहे .तसेच दुय्यम माहिती संकलना करिता आत्मचरित्रे, गौरव ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख , शासकीय दस्तऐवज, इंटरनेट इत्यादी माहिती स्त्रोतचा वापर करण्यात आला आहे.

**5. रामोशी–बेरड समाज संघटना आणि चळवळी :–** महाराष्ट्रातील रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमाती यांच्या काही संघटना महाराष्ट्रात स्थापन करण्यात आल्या. यामधील "नरवीर उमाजी नाईक समाज मंडळमहाराष्ट्र राज्य "या संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण व " बेरड समाज " अध्यक्ष डॉ भीमराव गस्ती यांनी या संघटनेच्या माध्यमातून रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातीच्या समस्या प्रश्न यासाठी 1980 पासून सातत्याने चळवळी केल्या. या संघटनेच्या माध्यमातून रामोशी–बेरड समाजातील समस्या संबंधी,त्यांच्या प्रश्नांसंबंधी काही मागणी, काही उद्दिष्टे मांडण्यात आले. हे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) क्रांतिकारी रामोशी–बेरड समाजात अनुसूचीत जमातीमध्ये समावेश करावे .
2) रामोशी–बेरड समाजात गुन्हेगारीच्या नजरेतुन पाहण्यात येऊ नये.
3) जगण्याचे साधन नसलेल्या या जमातीला सरकारी हक्कातील पडीक जमिनी कसण्यासाठी वनीकरण हा करिता देण्यात याव्यात.
4) भारतीय सैन्यदलात बाबा उमाजी नाईक बटालियन सुरू करावी.
5) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या नावे आर्थिक विकास महामंडळ सुरू करावे व या समाजाचे उत्थान करावे.
6) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक ट्रान्सलेट मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा.
7) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईकांना नाईक यांच्या चित्रपटासाठी अर्थ असा याबाबतचा बिरबल 2008 पासून प्रलंबित असणारा प्रस्ताव तात्काळ मंजूर करावा.
8) विमुक्त भटक्या जमातींच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठीची शिक्षण फी नियमित मिळत नाही, ती तात्काळ मिळावी.
9) पक्ष पातळीवर रामोशी समाजाच्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या तालुका शहर जिल्हा पातळीवरील कमी त्यामध्ये नेमणुका देण्याबाबत अनुशंगाने तालुका जिल्हा युवक अध्यक्ष यांना तसे कळविण्यात यावे.
10) समाजातील युवकांना विषेश कार्यकारी दंडाधिकारी पदावर पक्षाच्यावतीने नियुक्ती करणे.

वरील मागण्यांच्या संदर्भात या संघटनेच्या माध्यमातून अनेक आंदोलने, मोर्चे, परिशदा ,मेळावे यांचे आयोजन करून या जमातींच्या समस्या कमी होण्यासाठी किंवा त्यांचे निर्मूलन होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेल्या दिसून येतो. या संघटनेच्या माध्यमातून झालेले चळवळी येथे मांडण्याचा प्रयत्नसं शोधकाने सदर शोधनिबंधामध्ये केला आहे.

महाराष्ट्रातील रामोशी बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळी आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे

1) कर्नाटक महाराष्ट्र सीमा भागातील बेरड रामोशी समाजाची परिषद (8,9 मे 1983)
2) बेरड रामोशी परिषद
3) इंग्रजांविरुद्ध लढणारा रामोशी समाज उपेक्षित गीत
4) तहसील कचेरीवर समाजाचा मोर्चा 12 जून 1984 चंदगड कोल्हापूर
5) लोकसंख्येच्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करावी
6) पेठ वडगाव येथील रामोशी समाजाच्या जमिनीचा प्रश्न कोल्हापूर
7) रामोशी समाजाचा मोर्चा 3 एप्रिल 1995 गडिंग्लज कोल्हापूर
8) पेठवडगाव येथील रामोशी जमिनीची परिषद 4 जून 1995 कोल्हापूर
9) बेरड रामोशी समाजाचा मेळावा 16 व 17 ऑगस्ट 1987 बेळगाव
10) बेरड रामोशी समाजाचे आंदोलनाचे दुसरे पर्व
11) सांगली ते मुंबई पदयात्रा
12) पोलिसांचा महा त्रास थांबवावा याकरिता निवेदन 4 जून 1900 90
13) दलित महासंघ बेरड रामोशी मेळावा 1992 नेसरी कोल्हापूर
14) लक्षवेध मीधरणे आंदोलन दिनांक 20 मे 1996 पुणे
15) रामोशी समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन दिनांक 25 ऑक्टोंबर 1998 पंढरपूर सोलापूर
16) आद्य क्रांतिकारक म्हणून ' नरवीर उमाजी नाईक ' यांना घोषित करावे 2003
17) आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक अभियान 3 फेब्रुवारी 2009
18) रास्तारोको 13 जानेवारी 2012 वाघवाडी फाटा पुणे
19) हल्ला बोल आंदोलन दिनांक 22 जुलै 2013 मुंबई

रामोशी बेरड समाजाची चळवळ ही महाराष्ट्र सीमाभाग आणि महाराष्ट्र मध्ये प्रामुख्याने डॉ .भीमराव गस्ती विठ्ठल बन्ने आणि वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून सुरुवात झाली .रामोशी बेरड समाजाच्या चळवळी पूर्वी या चळवळीचे नेतृत्व हे भटक्या विमुक्त जमातीच्या अंतर्गत असणाऱ्या नेतृत्वाने केले होते परंतु 1980 च्या नंतर रामोशी समाजाची व बेरड समाजाची स्वतंत्र चळवळ उभी

राहिली. त्यामागील कारणांचा शोध घेत असताना असे आढळून आले की, भटक्या विमुक्त जमातीच्या चळवळी अंतर्गत वर्चस्ववाद यासाठी अनेक गट निर्माण झाली.याचा परिणाम असा दिसून येतो की भटक्या विमुक्त मधील जाती जमातींना असे वाटू लागले, कि या वर्चस्ववादात आपल्या जमातीचे प्रश्न मागे पडतील आणि आपल्या समाजाच्या समस्या जशा आहेत तशाच राहतील. म्हणून आपल्या जमातीच्या प्रश्नांसाठी एक आपली स्वातंत्र चळवळ उभी करण्यात यावी. यातून नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक मंडळ आणि बेरड समाज संघटनेची निर्मिती झाली. या संघटनेचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, या संघटना स्थिरस्थावर होत असताना संघटनेचे पुनर्वसन होण्यासाठी महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त नेतृत्वाच्या प्रसिद्धीस आलेल्या चेहऱ्यांचा त्यांनी उपयोग करून घेतला आहे .यामध्ये लक्ष्मण माने यांचे अग्रक्रमाने नाव घेता येईल. अनेक प्रश्नांसाठी व आपल्या समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आणि आपण संघटित झालो. तर आपल्या जमातीचे प्रश्न मार्गी लागतील या भावनेतून संघटक समाजाला एकत्र बांधत होता. समाजाची उन्नती ही रामोशी समाज ही अनुसूचित जमातीत गेल्याशिवाय होणार नाही. यासाठी संघटनेने प्रयत्नशील राहिलेली दिसून येते. त्याचबरोबर या जमातीवर पडलेल्या गुन्हेगारीचा शिक्का मिटवण्यासाठी या चळवळींना खूप प्रयत्न करावे लागले.कारण एक तर हा समाज उपेक्षित, उदरनिर्वाहाचे साधन नाही ,त्यात गुन्हेगार म्हणून पोलीस छळ करीत, पुरुषांना डांबून ठेवतात. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांचे उपासमार होत होती रामोशी–बेरड जमातीचे लोक धाडसी व शरीर दणकट त्यामुळे गावकरी त्यांना राखणदार म्हणून ठेवत त्याच बरोबर कसण्यासाठी थोडीबहुत जमीन दिली जात असे. परंतु या जमातीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन प्रस्थापित समाजाने त्यांच्या जमिनी बळकावल्या. त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यातून रामोशी–बेरड समाजाने या मागण्यांसाठी या चळवळी केल्या त्यामध्ये गुन्हेगारी शिक्का नष्ट व्हावा , समाजाची उन्नतीसाठी जमातींना अनुसूचित जाती जमातींच्या यादीत त्यांचा समावेश करण्यात यावा व त्यांना वतन दिलेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात राहण्यासाठी गायरान जमिनी व कसंण्यासाठी पदीक जमिनी प्राप्त व्हावा, या विविध मागणीसाठी अनेक चळवळी रामोशी–बेरड जमातीने केलेल्या दिसून येतात. नेतृत्वाने जमातीमध्ये एक अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न केला, याकरिता "नरवीर उमाजी नाईक" हा आपला आद्य क्रांतिकारक आहे. तो आपला देव व प्रेरणास्थान आहे. हे लोकांमध्ये रुजविण्यासाठी प्रयत्न चळवळीने केल्या. तसेच शासनाकडे पाठपुरावा करून नरवीर उमाजी नाईक यांना आद्यक्रांतिकारक घोषित करा. "नरवीर उमाजी नाईक" पुण्यतिथी दिवषी लोकांना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरु झाले. या प्रयत्नाचा यश म्हणून जेजुरी, जि. पुणे येथे नरवीर उमाजी नाईक यांचा पुतळा बसविण्यात आला

**निष्कर्श** :– रामोशी–बेरड जमातीच्या अनेक चळवळी, अधिवेषन ,मोर्चे ,निवेदने, पत्रके, या अनेक मार्गाने शासनापर्यंत त्यांच्या समस्या पोहोचण्याचा प्रयत्न केला.परंतु या जमातीचा मूळ प्रश्न सुटला नाही. प्रस्थापित संघटना या विशिष्ट पक्षाच्या राज्यआश्रयाला जाऊन बसल्या. संस्थापक अध्यक्ष हा अध्यक्ष पद सोडवायास तयार नाही. तरुण पिढीला प्रस्थापित संघटना, नेतृत्वावर आणि राजकीय पक्षावर विश्वास नव्हता. तरुणांचे असे म्हणणे होते की प्रस्थापित राजकीय पक्ष आपले प्रश्न सोडविणार नाही. आपण इतर पक्षांना आपले प्रश्न समजावून सांगू.परंतु त्यांचे हे म्हणणे संस्थापक अध्यक्ष यांना मान्य नव्हते. याचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रात आज रामोशी जमातीच्या अनेक संघटना निर्माण झाले आहे. या संघटना वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या प्रभावाने प्रभावित होऊन कार्य करीत आहे. उदा– राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस ,भाजपा, शिवसेना अशा विविध पक्षांशी संबंधित या संघटना राहिले आहेत. त्यामुळे समाजाचे विभाजन पर्यायाने या संघटित शक्तीचे ताकतीचे विभाजन झाले आहे . शासन हे दबावाचे ऐकते, राजकीय पक्ष डोक्यांची संख्या मोजते. मात्र या संघटनेची ताकद कमी झाली. कारण समाजाचे विभाजन झाले आणि त्यामुळे संघटनात्मक दबाव कमी झालेला दिसून येतो.आणि त्यामुळे या जमातीचे प्रश्न आज देखील सुटलेली नाहीत. एक गोष्ट मात्र येथे निश्चित सांगता येईल. नेते मात्र मोठी झाले पण त्याच जमातीतील सर्वसामान्य जनता काल होती, तेथेच आज आहे

***संदर्भ साहित्य :–***


1. *माने लक्ष्मण (1997) विमुक्तायन, प्रकाशन– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई*
2. *राठोड मोतीराज (1989) भटक्या–विमुक्तांची लढे,संपादित पुस्तक, महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा*
3. *महाराष्ट्र शासन पत्र क्र. काय करताय संकीर्ण 2008 यादी प्र .क्र. 553 % मावक–5, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032, दि .26 सप्टेंबर 2008 चे परिपत्रक*
4. *नरवीर उमाजी नाईक समाज मन समाज सुधारक मंडळ महाराष्ट्र राज्य या संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण आणि बेरड समाज अध्यक्ष भीमराव गस्ती यांनी संघटनेच्या माध्यमातून रामोशी–बेरड समाजाच्या समस्या चे परिपत्रक.*
5. *दैनिक सकाळ दि. 08–05–1983*
6. *दैनिक पुढारी दि .12– 05 -1983*
13. *दैनिक सकाळ दि 24–6 - 989*
14. *संघटनेचे निवेदन 04–06 –1990*
15. *दैनिक पुढारी दि. 25–10–1998*
16. *उमाजी नाईक सुधारक मंडळ प्रसिद्धीपत्रक (20 –05 –1996)*
17. *वसंतराव चव्हाण मुलाखत*
18. *भीमराव गस्ती मुलाखत*